# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

# इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज, वर्धा

**वर्ग : बी. एस्सी. प्रथम सत्र**

**विषय : मराठी**

## प्रश्नपत्रिका

---

**१. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (३०० शब्दात)** **१०**

अ. तंत्रज्ञानाच्या अति वापराचे दुष्परिणाम

ब. निसर्ग आणि मानव

**२. खालील दिलेल्या सहा प्रश्नांपैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा. (१०० शब्दात)** **२०**

१. 'उमाइनमस्कारें आंगुठा लावणे' या लीळेतून श्रीचक्रधर स्वामींनी वैज्ञानिक दृष्टिकोन कसा स्पष्ट केला?

२. 'सर्व धर्म हे सार्वजनिक सत्याची लेकरे आहेत' असे म. फुले का म्हणतात? चर्चा करा.

३. गोपाळ गणेश आगरकारांनी वाचनाचे कोणते प्रकार सांगितले?

४. यशवंत मनोहर यांच्या मते, भारतीय विज्ञाननिष्ठ संविधानाचा उद्देश कोणता?

५. श्रीनिवास ठाणेदार यांच्या जीवनप्रवासाचे दर्शन 'ही श्रीची इच्छा' या पाठातून कसे घडते?

६. आगरकरांच्या मते व्यसनी लोकांपेक्षा वाचन करणारी माणसे कशी वेगळी ठरतात?

**३. खालील दिलेल्या सहा प्रश्नांपैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा. (१००शब्दात)** **२०**

१. 'अरे अरे ज्ञाना झालासि पावन' असे संत ज्ञानेश्वर कां म्हणतात?

२. 'या भारतात बंधूभाव नित्य वसू दे' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

३. 'झपूर्झा' कवितेचे रसग्रहण करा.

४. कवी विंदा करंदीकर यांनी 'माझ्या मना बन दगड' या कवितेतून कोणता विचार मांडला?

५. कवी ग्रेस यांनी 'पाऊस' या कवितेतून कोणते दु:ख व्यक्त केले?

६. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' या अभंगातून संत तुकारामांनी कोणता उपदेश केला आहे?

**४. खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.** **१०**

१. प्रसारमाध्यमाकरिता करावयाच्या लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. आजच्या मराठी लेखनाला अनुसरून अनुस्वाराचे चार नियम उदाहरणासहित स्पष्ट करा.